जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५४७ दिनांक - २७/१२/२०२४**

हडपसर पोलिस स्टेशन पुणे शहर

## हडपसर परिसरात नशा करण्यासाठी वापरले जाणारे मॅफेनटरमाइन सल्फेट ( टर्मीन ) इंन्जेक्शनची बेकायदेशिरपणे विक्री करणा-या महिलेस हडपसर तपास पथकाकडून अटक. अंदाजे १,००,०००/- किंमतीच्या मॅफेनटरमाइन सल्फेट (टर्मीन) च्या १६० बाटल्या जप्त

मागील काही महिन्यांपासून हडपसर परिसरातील अल्पवयीन मुले मॅफेनटरमाइनचे इन्जेक्शन घेवून नशापाणी करून गुन्हेगारीकडे वळत असल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक,हडपसर पो.स्टे श्री.संतोष पांढरे यांनी सदर बाबत सक्त कारवाई करणेबाबत तपास पथकास सुचना दिल्या होत्या.

दिनांक २६/१२/२०२४ रोजी तपासपथक प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अर्जुन कुदळे यांना प्राप्त गुप्त बातमी वरून मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक,हडपसर पोलीस स्टेशनचे श्री.संतोष पांढरे , यांच्या आदेशाने सहाय्यक पोलीस निरीक्षक,अर्जुन कुदळे, पोलीस उप-निरीक्षक महेश कवळे, आणि तपासपथक अंमलदार सुशील लोणकर, प्रशांत दुधाळ, निखील पवार, कुंडलीक केसकर, निलेश किरवे, गायत्री पवार यांचे सह मिळालेल्या बातमीचे अनुषंगाने छापा कारवाई करून संशयीत महिला अंबिका ऊर्फ नेहा आनंदसिंग ठाकुर वय २६ वर्षे रा.माळवाडी हडपसर पुणे हिस ताब्यात घेवुन तिच्याकडून एकूण १६० MAPHENTERMINE SULPHATE INJECTION IP च्या बाटल्या हस्तगत करण्यात आल्या. त्याबाबत तिचेकडे विचारणा केली असता,ती सदरचे औषध हे नशा करण्यासाठी प्रति इंजेक्शन ४००/- ते ५००/- रुपयाला विक्री करत असल्याचे सांगितले.

आरोपी महिला अंबिका ऊर्फ नेहा आनंदसिंग ठाकुर, हिचेकडे कोणताही औषध विक्री परवाना नसताना, सदरचे औषध विक्री करण्याचे कोणतेही शिक्षण घेतले नसताना,सदर औषध केमिकल असून डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय वापरल्यास व व्यक्तीस टोचल्यास त्यातील विषारी द्रव्यांचे दुष्परिणाम होवुन,औषध घेणा-या व्यक्तीच्या आरोग्यास गंभीर इजा होवु शकते हे माहित असताना सुध्दा नशा करण्यासाठी गैरवापर करण्याच्या उद्देशाने अनाधिकाराने बेकायदेशीररित्या विक्रीकरिता आपले कब्जात घेवुन मिळून आल्याने **हडपसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१९४१/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम १२३,२७५,२७८,१२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे**.महिला आरोपीकडे केले कौशल्यपुर्ण तपासात तिचेकडून MAPHENTERMINE SULPHATE INJECTION IP च्या एकूण १६० बॉटल्स या जप्त करण्यात आल्या आहेत. त्याची बाजार भावानुसार अंदाजे किंमत १,००,०००/- इतकी आहे.गुन्ह्याचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अर्जुन कुदळे, हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग,श्री.मनोज पाटील, मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ डॉ.श्री.राजकुमार शिंदे, यांचे मागदर्शनाखाली मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे,श्रीमती अश्विनी राख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन,श्री.संतोष पांढरे, पोनि.(गुन्हे),श्री.निलेश जगदाळे, पोनि.(गुन्हे) श्री.अमर काळंगे, यांचे सुचनांप्रमाणे तपास पथकाचे सहाय्यक

पोलीस निरीक्षक अर्जुन कुदळे, पोलीस उप निरीक्षक महेश कवळे, पोलीस अंमलदार सुशील लोणकर,संदीप राठोड,सचिन जाधव,निलेश किरवे,प्रशांत दुधाळ,निखील पवार,कुंडलीक केसकर,अमोल दणके,गायत्री पवार यांचे केली आहे.

